135


# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य
डॉ.नायडू रुग्णालय आवार,पुणे-१

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५९५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
ई-मेल : crs_d83@yahoo.com


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/नांव समाविष्ट/ 6307-6377 /२०१३ दिनांक :-7 मे २०१३

**परिपत्रक**

विषय :- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १२ नुसार प्रमाणपत्राची प्रथम प्रत मोफत देणे बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र आमाजीआ /कक्ष ८३/ज मृ प्रमाणपत्र /४६८७-५३०७ २०१२. दिनांक १८ जुलै २०१२.

उपरोक्त विषय व संदर्भीय परिपत्रान्वये आपल्या अधिनस्त निबंधक / उप निबधक यांना कलम १२ नुसार जन्म-मृत्यु घटना घडल्यापासुन २१ दिवसांच्या आत घटनेची माहिती प्राप्त झाल्यास प्रथम प्रत विनामूल्य देण्या बाबतची कार्यवाही करणे बाबत सूचना दिल्या होत्या. या संदर्भात केंद्रशासनाच्या उपमहानिबंधक जन्म-मृत्यु यांनी सदरची प्रथम प्रत **त्वरीत** देण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

यास्तव आपणांस सूचित करण्यांत येत आहे की, **२१ दिवसांच्या आत कलम ८ व ९ नुसार,घटनेची माहिती देणा-या व्यक्तीस निबंधकाने जन्म व मृत्यु घटनेची नोंद करुन त्वरीत प्रथम प्रमाण पत्र मोफत वितरीत करावे**. आपल्या अधिनस्त सर्व निबंधक /उपनिबंधक जन्म -मृत्यु यांना याबाबतची कार्यवाही करणे बाबत सूचित करावे, तसेच जिल्हयाअंतर्गत सर्व निबंधकांकडून अधिनियमातील या तरतूदीचे काटेकोर पणे पालन होईल असे पहावे.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रति- १) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु महानगरपालीका (सर्व)
२) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु बृहन्मुंबई महानगरपालीका
३) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक (सर्व)

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह सादर :-
उपसंचालक, आरोग्य सेवा,परिमंडळे ............. (सर्व)
प्रत माहितीसाठी सविनय सादर :- मा. संचालक, आरोग्य सेवा, महराष्ट्र राज्य, मुंबई

E:\83\Circular.doc